# भगवान श्रीकृष्णाचा अक्षय अनुग्रह

## महाभारतातील एका कथेवर आधारित

आपला ज्येष्ठ भ्राता धर्मराज युधिष्ठिर याच्या नेतृत्वाखाली, सदाचरणी असे पांडव बंधू हस्तिनापूर साम्राज्याचे न्यायसंगत उत्तराधिकारी होते. परंतु, त्यांचा मत्सरी चुलत भाऊ दुर्योधन याच्या कपटकारस्थानांमुळे त्यांना बारा वर्षांसाठी राज्यातून हद्दपार करून वनवासात पाठवले गेले.

पांडवांविषयी निष्ठा बाळगणारे अनेक ऋषीदेखील पांडवांसमवेत वनवासात गेले. धर्मराज युधिष्ठिराला हे समजत नव्हते की, आपला परिवार आणि ऋषींचे भरणपोषण करण्याचे त्याचे दायित्व तो कसे निभावणार आहे. वरदान प्राप्त करून घेण्यासाठी धर्मराज युधिष्ठिराने सूर्यदेवाची प्रार्थना केली. युधिष्ठिराची प्रार्थना सूर्यदेवाने ऐकली आणि ते त्याच्यासमोर प्रकट झाले. दिव्य सूर्यदेवाने परिधान केलेले कवच सोनेरी प्रभा असलेले होते आणि त्याच्या हातात एक अद्भुत पात्र होते, जे सूर्यासमान चमकदार आणि तेजोमय होते. ते 'अक्षयपात्र' होते.

सूर्यदेव म्हणाले, "हे ज्येष्ठ पांडु पुत्रा, या दिव्य पात्राचा स्वीकार कर. हे पात्र ईश्वराच्या अक्षय अनुग्रहाचे प्रतीक आहे. या पात्रातून तुला आणि तुझ्या भावंडांना दररोज भोजन प्राप्त होत राहील. सर्व ऋषींना भोजन देण्याची सेवा, द्रौपदीने म्हणजेच तुझ्या पत्नीने करावी. आणि आपल्या रितीरिवाजानुसार, सवानी भोजन केल्यानंतर सर्वात शेवटी द्रौपदीने भोजन ग्रहण करावे. अशा प्रकारे भोजन केल्यास, तुम्हाला कधीही उपाशी राहावे लागणार नाही असे मी तुला वचन देतो."

सूर्यदेवाने दिलेल्या या उपहाराकरता पांडव त्यांच्याप्रति कृतज्ञ होते आणि दररोज त्यांच्या आदेशानुसार अक्षय पात्रातून ते आपले भोजन ग्रहण करू लागले. पांडवांचे आणि सर्व ऋषींचे भोजन झाल्यानंतरच द्रौपदी आपले भोजन करत असे. त्यानंतर दुसऱ्या दिवशीची सकाळ होईपर्यंत ते पात्र रिकामे राहत असे, आणि पुढच्या सकाळी जादूमयरित्या ते पुन्हा भोजनाने भरले जात असे.

अक्षयपात्राविषयीची ही खबर जेव्हा हस्तिनापुरला पोहोचली, तेव्हा दुष्ट दुर्योधनाचा संतापाने तीळपापड झाला. त्याने पांडवांच्या विरूद्ध एक दुष्ट चाल रचली. तो दुर्वास मुनींना भेट देऊ लागला, त्यांच्याकडून वरदान प्राप्त व्हावे या आशेने, तो दुर्वास मुनींसह त्यांच्या दहा हजार शिष्यांच्या भोजनाचा प्रबंध करू लागला. दुर्वास हे एक सामर्थ्यवान मुनी होते आणि त्यांच्या क्रोधी स्वभावासाठी सर्वदूर प्रसिद्ध होते. किंचितसाही अवमान झाला तरी ते लगेच शाप देत असत.

दुर्वास मुनींच्या क्रोधाला राजे-महाराजे तसेच देवी-देवता घाबरत असत. परंतु, दुर्योधनाच्या सेवेमुळे संतुष्ट होऊन ते म्हणाले, "मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे. तू जे मागशील, ते तुला दिले जाईल."

आपल्या शत्रूंचा विनाश करण्याच्या शक्यतेने उतावीळ झालेला दुर्योधन याच क्षणाची प्रतीक्षा करत होता.

दुर्योधनाने नम्रतेने वाकून दुर्वास मुनींना प्रणाम केला आणि म्हणाला, "हे महर्षि! हे योगीराज! माझी अशी इच्छा आहे : आपण वनातील पांडवांना दर्शन देण्याची कृपा करावी. ते माझे प्रिय मित्र आहेत आणि अतिशय पुण्यवान आहेत. आपल्या दर्शनाने त्यांना फार आनंद होईल. कृपया, द्रौपदीचे जेवण झाल्यानंतर आपण तिथे जावे, जेणेकरून ती चांगल्या रीतीने तुमची सेवा करू शकेल." मुनींनी याला सहमती दर्शवली आणि दुसऱ्याच दिवशी ते आपल्या दहा हजार शिष्यांसह पांडवांच्या कुटीच्या दिशेने मार्गस्थ झाले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मुनींना येताना पाहून, धर्मराज युधिष्ठिर त्यांच्या स्वागतासाठी आपल्या भावंडांसह शीघ्रतेने त्यांना सामोरा गेला. या महान मुनींचे स्वागत करण्याच्या गडबडीत युधिष्ठिराला याची आठवण राहिली नाही की, द्रौपदीने नुकतेच तिचे जेवण संपवले होते. त्याने हात जोडून दुर्वास मुनींचे स्वागत केले आणि तो म्हणाला, "हे मुनिवर! आपण कृपया नदीत स्नान करावे, आणि त्यानंतर तुम्हाला आणि तुमच्या शिष्यांना भोजन देण्याचे सौभाग्य आम्हाला मिळावे."

द्रौपदी अतिथींचे स्वागत करण्यासाठी कुटीतून बाहेर आली. धर्मराज युधिष्ठिराने दिलेल्या आमंत्रणाविषयी ऐकताच ती भीतीने थरथर कापू लागली. अक्षय पात्र तर रिकामे झाले होते! भुकेलेले मुनिवर आणि त्यांचे शिष्य यांना भोजन देता येणे आता अशक्य होते. दुर्वास मुनी आता निश्चितच तिच्या संपूर्ण कुटुंबाला शाप देतील.

द्रौपदी धावत आपल्या कुटीत गेली आणि गुढघे टेकून पूजावेदीसमोर बसली व अतिशय व्याकुळतेने पांडवांचे श्रीगुरू, भगवान श्रीकृष्णाला ती प्रार्थना करू लागली.

"हे श्रीकृष्ण,
आपली शक्ती अपरंपार आहे,
आपण पीडितांचे शाश्वत देवता आहात,
समस्त विश्वाचे आणि सृष्टीचे पालनकर्ते आहात,
आपण परात्पर आहात, सर्वांचे परम आश्रयस्थान आहात!

हे देवेश, आपल्याला शरण आल्यानंतर
सर्व आपत्ती नष्ट होतात.
आपण याआधीही अनेकदा माझे रक्षण केले आहे
या संकटापासून आपणच माझे रक्षण करा."

द्रौपदीची प्रार्थना ऐकून भगवान श्रीकृष्ण तत्काळ तिच्यासमोर प्रकट झाले. सत्याचे आणि धर्माचे मूर्तरूप, ते समस्त दिव्य लोकांसम ज्योतिर्मय होते. ते दृढ आणि प्रेमळ स्वरात म्हणाले, "द्रौपदी मला खूप भूक लागली आहे! लवकर! माझ्यासाठी काहीतरी खायला घेऊन ये!"

द्रौपदी विनयपूर्ण आवाजात म्हणू लागली, "परंतु हे प्रभू, इथे तर काहीच अन्न शिल्लक नाही! अक्षयपात्र रिकामे आहे, आणि दुर्वास मुनी आमच्यावर रागावतील! कृपया मला साहाय्य करा!"

सर्वांच्या हृदयी वास करणाऱ्या त्या भगवान श्रीकृष्णाने तिला पुन्हा आदेश दिला, "लवकर, लवकर! माझ्या पोटात भुकेने कावळे कोकलू लागले आहेत. सूर्यदेवाचे पात्र माझ्याकडे घेऊन ये! त्यात काही ना काही तरी नक्कीच शिल्लक राहिलेले आहे!"

द्रौपदीने विचार केला, "भगवंतावर पूर्ण विश्वास ठेवणे आणि त्याच्या आज्ञेचे पालन करणे हा तर माझा धर्म आहे. ते तर अदृश्यालाही पाहतात आणि अशक्याला शक्य बनवतात. मी स्वतःला त्यांच्या आज्ञेप्रति समर्पित केले पाहिजे." तिने भगवंताला वाकून प्रणाम केला आणि अक्षयपात्र स्वतःच्या श्रीगुरूंना आणून दिले. भगवान श्रीकृष्णाने पात्राच्या कडांवर आपले बोट फिरवले. मग भगवंताने द्रौपदीकडे पाहून स्मितहास्य केले आणि आपले बोट वर उचलले; त्या बोटाला भाताचे एक शीत चिकटले होते. भगवंताने अतिशय चवीने, मोठ्या आनंदाने ते शीत खाल्ले. मग भगवंत म्हणाले, "विश्वात्मा श्रीहरी या अर्पणाने पूर्ण तृप्त होवो."

भीम, जो पांडवांमध्ये सर्वात बलशाली होता, तो ही दिव्य लीला पाहत होता. भगवान श्रीकृष्णाने त्याच्याकडे वळून म्हटले, "लवकर जा आणि दुर्वास मुनी तसेच त्यांच्या शिष्यांना भोजन ग्रहण करण्यासाठी बोलावून आण!"

याच दरम्यान, नदीत स्नान करणाऱ्या दुर्वास मुनींची आणि त्यांच्या शिष्यांची भोजनाची इच्छा अचानक नाहीशी झाली. एका शिष्याने विचारले, "हे मुनिवर्य, आता आपण काय करावे? आमचे पोट तर आकंठ भरल्यासारखे वाटते आहे. आम्ही पूर्णतया तृप्त आहोत. पांडवांकडे भोजन करणे तर आता असंभव आहे." मुनींनी उत्तर दिले, "एकदा आमंत्रण स्वीकारल्यानंतर ते जर नाकारले, तर ती आपली गंभीर चूक ठरेल. युधिष्ठिर आणि त्याचे बंधू पुण्यवान तर आहेतच, परंतु ते

योद्धेदेखील आहेत. या गैरवर्तणुकीने ते क्रोधित होतील. तेव्हा ते परत येण्यापूर्वीच आपण इथून निघून गेलेले बरे."

भगवान श्रीकृष्णाच्या निर्देशानुसार भीम नदीवर गेला आणि त्याने पाहिले की, दुर्वास मुनी आणि त्यांचे शिष्य तातडीने पांडवांच्या कुटीपासून दूर पळून जात आहेत. भीमाने जेव्हा हे युधिष्ठिराला सांगितले, तेव्हा युधिष्ठिराने त्याला विचारले की, हे सर्व कसे शक्य झाले. तेव्हा भीमाने त्याला भगवान श्रीकृष्णाच्या लीलेबाबत सांगितले. आपल्या श्रीगुरूंच्या, श्रीकृष्णाच्या दर्शनासाठी आणि आपली कृतज्ञता अर्पण करण्यासाठी सर्व पांडव त्वरेने आपल्या कुटीकडे गेले.

प्रभूंनी मनमोहक हास्यासह सर्वांचे स्वागत केले. द्रौपदीने सांगितले की, कसे भगवान श्रीकृष्ण तिथे प्रकट झाले आणि कशा प्रकारे त्यांनी अक्षयपात्रात उरलेल्या भाताचे शीत आनंदाने ग्रहण केले. कृतज्ञतेने पांडवांच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले आणि ते सर्व भगवान श्रीकृष्णासमोर नतमस्तक झाले.

भगवान श्रीकृष्णाने सांगितले, "द्रौपदीच्या करुण प्रार्थनेमुळेच मी इथे उपस्थित झालो आहे. भाताच्या एका शीताची तिची भेट जरी अतिशय साधारण असली, तरी तिच्या श्रद्धेने आणि भक्तीने मला प्रसन्न केले. माझ्यावर तिचा अढळ विश्वास होता. एखादी व्यक्ती जेव्हा प्रेमाने आपले कार्य करते आणि ते ईश्वराला समर्पित करते, तेव्हा तिच्या अगदी छोट्याशा सत्कर्मातदेखील अनेक लोकांचा उद्धार करण्याची शक्ती असते.

"द्रौपदीने, तुम्हा पांडवांप्रमाणेच तिचा स्वधर्म निभावला आहे. हे सदैव स्मरणात ठेवा की, अक्षयपात्राप्रमाणेच ईश्वराचा अनुग्रहदेखील शाश्वत आणि अक्षय आहे. आणि जे पुण्यशाली जन ईश्वराला शरण जातात, त्यांचा निश्चितच विजय होतो. यशस्वी भव!"

युधिष्ठिराने भगवान श्रीकृष्णाला सांगितले, "हे प्रभू! आपण शांतीचे स्रोत आहात तसेच यश-समृद्धीचे धाम आहात. आपणास आमचे वारंवार प्रणाम. आमच्या हृदयात आम्ही सदैव आपले स्मरण करत राहू!"

अनंत अशा ईश्वरात समस्त प्राणिमात्रांचे अस्तित्व सामावले आहे. खरोखरच, द्रौपदीच्या त्या अर्पणाने भगवान श्रीकृष्ण संतुष्ट झाले आणि त्यामुळे दहा हजार लोकांची भूक भागली आणि आश्चर्यकारकरित्या पांडवांचेही रक्षण झाले.

***

महाभारत

महाभारत हे महर्षि वेदव्यासांनी संस्कृत भाषेत लिहिलेले एक महाकाव्य आहे. रामायणाबरोबरच महाभारत हेदेखील भारताच्या सर्वाधिक प्रसिद्ध पवित्र साहित्यिक रचनांपैकी एक रचना आहे. बोधकथांनी आणि शिकवणींनी समृद्ध असलेल्या महाभारतात श्रीभगवद्गीतेचा आध्यात्मिक ठेवा निहित आहे.

***

पुनःकथन : मॉर्गन हूपर यांच्याद्वारे

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.